**प्रेस नोट**

जा.क्र.स्था.गु.शा/ प्रेस नोट/०१ /२०२१
पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग
फॅक्स नं. ०२३६२-२२८२०५,
फोन नं. ०२३६२-२२८२०९
दिनांक - ०२/०१/२०२१.

## घर फोडी करुन चोरी करणा-या इसमांस स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने शिथाफिने ताब्यात घेतलेबाबत.

सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ पोलीस ठाणे हद्दीतील माणगांव मळावाडी येथे दिनांक २२/१२/२०२० रोजी रात्रौ १९.०० ते रात्रौ ००.०० वाजताचे मुदतित श्रीमती अनुराधा गोपीनाथ खरवडे यांचे राहते घरी अज्ञात इसमाने घरफोडी चोरी करुन १,२२,०००/- सोन्याचे दागिने व रोख रक्कम ५०००/- असा मुद्देमाल चोरुन नेलेबाबत कुडाळ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि क्रमांक २६०/२०२० भा. द. वि.क.४५७,३८० प्रमाणे दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्ह्यातील आरोपी हा गुन्हा घडल्यापासुन पोलीसांना चकवा देत नजरेआड झालेला होता. सदर गुन्हयात आरोपीने कोणताही दुवा मागे सोडला नव्हता.

मा. पोलीस अधीक्षक श्री. राजेंद्र दाभाडे, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. तुषार पाटील व पोलीस निरीक्षक, श्री.सुनिल धनावडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या टिमने गोपनिय माहितीव्दारे तसेच सदर आरोपीचे गुन्हयाच्या कार्यपध्दतीबाबत अभ्यास करुन सदर आरोपीची माहिती काढून आरोपी संदीप उर्फ बंड्या दाजी गुंजाळ, हॉटेल कामगार, रा. माणगांव मळावाडी हा चोरी करुन घेऊन गेलेला सोन्याचे दागिने हा विकण्यासाठी एस. टी. स्टॅन्डवर येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मिळाली होती. सदर आरोपीच्या मुसक्या आवळण्यासाठी स्थानिक गुन्हा शाखेचे अधिकारी व कर्मचारी हे आरोपीला कोणताही संशय न येण्याच्याउद्देशाने सावंतवाडी येथे पाळत ठेऊन होते.

दिनांक ०२/०१/२०२० रोजी सदर आरोपी हा सावंतवाडी एस.टी. स्टॅन्डच्या परीसरात आल्यानंतर पोलीसांनी आरोपी संदीपउर्फ बंड्या दाजी गुंजाळ यांच्या मुसक्या आवळण्यात यशस्वी झाले. त्यावेळी त्यांचेकडे विकरण्यासाठी आणलेले ७५००/- रुपयाचे सोन्याचे दागिने,२३०००/- रुपये रोख रक्कम व १०५००/- रुपयाचा मोबाईल मिळून आला. सदर आरोपी यांनी आपण दिनांक २२/१२/२०२० रोजी रात्रौ ०९.०० वाजता श्रीमती अनुराधा खरवडे यांचे बंद घराचे बाहेर मंगलौरी

02-01-2021

कौलाची खाली ठेवलेली घराच्या कुलुपाची चावी काढून त्याव्दारे कुलुप उघडून घरात प्रवेश करुन घरत ठेवलेल्या किचनमधील डब्यातील चावी काढून त्यातील सोन्याचे मंगळसुत्र, सोन्याची कर्णफुले, व रोख रक्कम ५०००/- असे चोरी करुन आपण पळून गेल्याचे सांगतले त्यापैकी दिनांक २३/१२/२०२० रोजी सावंतवाडी तिठा येथील मुतुट्ट फायनान्स येथे सोन्याचे मंगळसुत्र तारण ठेऊन त्यावर १,१०,५००/- रुपये घेतले असल्याचे सांगितले आहे. पुढील तपास कुडाळ पोलीस ठाणे अधिकारी करीत आहेत.

सदर कारवाईत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील श्री.सुनिल धनावडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक- श्री.सचिन शेळके व पोलीस अंमलदार-श्री. सुधीर सावंत ,प्रकाश कदम, रवि इंगळे, रमेश पालकर यांनी सहभाग घतलेला होता.

( एस.के.धनावडे )
पोलीस निरीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग

प्रति,

मा. जिल्हा माहिती अधिकारी
सिंधुदुर्ग